ePaper

| वर्ष - 8 | अंक - 20 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 25 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मुंबई, ठाणे, विरारसह नवी मुंबईत मुसळधार; दिवसभर जोर'धार'!



### आतील पानांत


- नताशाची इन्स्टावर पहिलीच पोस्ट
- 2024 नंतर आयसीसीची मोठी कारवाई!
- नितीश बिहार विधानसभेत भडकले
- प्रणिती शिंदे यांचं पहिलंच भाषण


## आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे; जिल्हाधिकारी डॉ.दिवसे यांचे आवाहन

# पुणे शहरात पावसाचा हाहाकार!

## पुणे, पिंपरी चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातील सर्व शाळा बंद

। पुणे । महाईन्यूज

**पुणे शहर आणि जिल्ह्याच्या परिसरात पावसाचा जोर वाढला असल्याने जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी पुणे शहर आणि जिल्ह्यातील शाळांना सुटी जाहीर केली आहे. हवामान विभागाने येत्या काही तासात पुणे शहर, भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली तालुक्यातील खडकवासला परिसरात अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला**



असल्याने (रेड अलर्ट) या भागातील शाळा २५ जुलै रोजी बंद ठेवव्यात, आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.सुहास दिवसे यांनी दिले आहेत. खडकवासला धरणातून ४० हजार क्यूसेक विसर्ग सुरू होत आहे. तसेच पुणे शहराच्या सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.दिवसे यांनी केले आहे.

### सिंहगड रस्त्यावरील सोसायट्या पाण्याखाली

सिंहगड रस्त्यावरील एकता नगरी परिसरातील द्वारका, जलपूजन, शारदा सरोवर, शाम सुंदर या गृहनिर्माण सोसायटी पाण्याखाली गेल्या आहेत. मध्य वस्तीत पावसाचा अधिक जोर होता. हडपसर, नगर रोड परिसर, कात्रज, बिबवेवाडी परिसरात पावसाचा कहर सुरु होता.

### या ठिकाणी जाण्यास नागरिकांना प्रतिबंध

खडकवासला धरणातून मुठा नदी पात्रात सकाळी सहा वाजल्यापासून ३५५७४ क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. तसेच धरण परिसरात १०० मिलिमीटर आणि घाटमाथ्यावर २०० मिलिमीटरपेक्षा जास्त सरासरी पावसाची नोंद झालेली आहे. पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार विसर्ग पुन्हा वाढवण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही ठिकाणी जाण्यास नागरिकांना प्रतिबंध करण्यात आले आहे. भिडे पूल, गरवारे कॉलेजमधील खिल्लारे वस्ती कॉलेज परिसर, शितळा देवी मंदिर डेक्कन, संगम पूल पुलासमोरील वस्ती, जयंतराव टिळक पूल आणि होळकर पूल परिसर या ठिकाणी जाण्यास नागरिकांना प्रतिबंध करण्यात आला आहे, असे खडकवासला पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून कळवण्यात आले आहे.

---

# अमित शाह यांच्या निषेधार्थ शिवसेनेचे आंदोलन!

## उद्धव ठाकरे यांच्यावरील टीकेला प्रत्यूत्तर : पिंपरीतील डॉ. आंबेडकर चौकात घोषणाबाजी

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।




भारतीय जनता पक्षाच्या पुणे या ठिकाणी पार पडलेल्या महाराष्ट्र प्रदेश अधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या बद्दल केलेल्या बेताल वक्तव्याचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने जाहीर निषेध करण्यात आला. पिंपरी येथील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी शहा यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत शहा यांच्या प्रतिमेस जोडो मारो आंदोलन करण्यात आले. या निषेध आंदोलन प्रसंगी बोलताना मावळ लोकसभेचे संघटक व माजी महापौर संजोग वाघेरे पाटील यांनी अमित शहा यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दात निषेध करताना म्हणाले कि, पुरोगामी महाराष्ट्रात येऊन शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या विषयीचे अपशब्द बिलकुल खपवून घेतले जाणार नाहीत.

महाराष्ट्रातून नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकींत भारतीय जनता पक्षाला अपेक्षित यश न मिळाल्याने या नैराश्याच्या भावनेतून उद्धवजी ठाकरे यांच्या विषयी निरर्थक व निंदनीय वक्तव्य केल्याचे दिसते. शहा यांच्यात उद्धव ठाकरे यांना हिंदुत्व शिकविण्याची पात्रता नाही. त्यामुळे हिंदू मुस्लीम यांच्यातील सलोखा बिघडविण्याचे काम शहा यांनी करू नये असा इशारा या वेळी वाघेरे यांनी दिला.

### आंदोलनामध्ये यांची उपस्थिती...

या प्रसंगी शिवसेना पुणे जिल्हा प्रमुख माजी आमदार गौतम चाबुकस्वार व माजी विरोधीपक्ष नेत्या व जिल्हा संघटिका सुलभाताई उबाळे यांनी निषेध नोंदवला. या आंदोलनास युवासेना प्रमुख चेतन पवार, पिंपरी विधानसभा अध्यक्ष तुषार नवले, चिंचवड विधानसभा अध्यक्ष अनंत को-हाळे, उपशहर प्रमुख राजाराम कुदळे, पिंपरी विधानसभा महीला संघटिका डॉ.वैशाली कुलथे, चिंचवड विधानसभा उपशहर संघटिका ज्योती भालके, उपविभाग संघटिका तस्लिम शेख, नीता लोखंडे, संदीप भालके, माधव मुळे, निखिल दळवी, कुदरत खान, ऋषिकेश सोनकांबळे, गोपाल मोरे, दीपक भक्त व शिवसैनिक - पदाधिकारी उपस्थित होते.

# ससूनमधील रुग्ण बाहेर गेला कसा?

## रुग्णालयामध्ये रुग्णांना उपचार मिळत नाहीत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ससून सर्वोपचार रुग्णालयात दाखल बेवारस रुग्णाला निर्जनस्थळी सोडून देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी निवासी डॉक्टर आदि कुमार यांना तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. याचबरोबर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. या सर्व प्रकारामुळे ससूनमधील रुग्णसेवेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**




चौकशीअंती दिव्यांग प्रमाण पत्रानीलेश हिनवटी (वय ३२, रा. मध्य प्रदेश) असे या रुग्णाचे नाव आहे. त्याच्यावर ससूनमधील अस्थिव्यंगोपचार विभागात उपचार सुरू होते. त्याला २२ जुलैला पहाटे ३ वाजता येरवडा मनोरुग्णालयासमोर सोडून दिल्याचे समोर आले आहे. निवासी डॉक्टर आदि कुमार यांनी एका कर्मचाऱ्याच्या मदतीने या रुग्णाला तिथे सोडल्याचा आरोप करण्यात आला आहे. याची तातडीने दखल घेत रुग्णालय प्रशासनाने डॉ. कुमार यांना निलंबित केले आहे.याप्रकरणी चौकशीसाठी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी समिती नेमली आहे. ही समिती रुग्ण, तक्रारदार, रिक्षाचालक, डॉ. कुमार यांचा जबाब नोंदविणार आहे. त्याचबरोबर रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेजही तपासले जाणार आहे. या रुग्णाला आता पुन्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. रुग्ण दोन्ही पायांनी चालू शकत नाही. त्यामुळे त्याच्या नातेवाइकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यासाठी समाजसेवा विभागाचीही मदत घेतली जात आहे, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

हिनवटी यांचा डांगे चौक परिसरात १६ जूनला अपघात घडला होता. पायावरून बसचे चाक गेल्याने त्यांचे दोन्ही पाय निकामी झाले. त्यांना १०८ या आपत्कालीन वैद्यकीय सेवेच्या रुग्णवाहिकेमधून ससूनमध्ये दाखल करण्यात आले. त्याच दिवशी शस्त्रक्रिया करून डॉक्टरांनी त्याचे प्राण वाचविले. त्यानंतर २७ जूनला दुसरी शस्त्रक्रिया करण्यात आली. प्रकृती सुधारत असतानाच रुग्ण घरी सोडण्याची मागणी करीत होता, असे रुग्णालय प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.रुग्णाला मध्यरात्रीच्या सुमारास एका रिक्षातून रुग्णालयातून बाहेर नेल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ससूनमधून रुग्ण बाहेर का गेला, यासह अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाले आहेत. हा रुग्ण दोन्ही पायांनी अधू असल्याने त्याला रिक्षापर्यंत कोणी सोडले, त्याला बाहेर सोडण्यासाठी मध्यरात्रीची वेळ का निवडण्यात आली आणि डॉक्टरांनी रुग्णाला स्वत: रिक्षात बसविले का, असेही अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. दरम्यान, डॉ. कुमार यांनी आरोप फेटाळून लावले आहेत. त्याचबरोबर मार्ड संघटनेनेही याप्रकरणी वैद्यकीय शिक्षण विभागाकडे निवेदन दिले असून, त्यात आरोपांमध्ये तथ्य नसल्याचा दावा केला आहे.ससून रुग्णालयामध्ये आलेल्या रुग्णांना वेळेत उपचार मिळत नाहीत. रुग्णालयात सातत्याने गुन्हेगारी कृत्ये वाढत आहेत. त्यातून रुग्णालयाचा लौकिक खालावत आहे. ससूनच्या कारभाराबद्दल विधिमंडळ अधिवेशनातही प्रश्न उपस्थित केला होता. त्या वेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी ससूनमध्ये सर्वपक्षीय आमदारांची बैठक घेण्याचे जाहीर केले. अद्याप ही बैठक झालेली नाही.

### डॉ. कुमार यांना केले निलंबित

चौकशीअंती दिव्यांग प्रमाण पत्रानीलेश हिनवटी (वय ३२, रा. मध्य प्रदेश) असे या रुग्णाचे नाव आहे. त्याच्यावर ससूनमधील अस्थिव्यंगोपचार विभागात उपचार सुरू होते. त्याला २२ जुलैला पहाटे ३ वाजता येरवडा मनोरुग्णालयासमोर सोडून दिल्याचे समोर आले आहे. निवासी डॉक्टर आदि कुमार यांनी एका कर्मचाऱ्याच्या मदतीने या रुग्णाला तिथे सोडल्याचा आरोप करण्यात आला आहे. याची तातडीने दखल घेत रुग्णालय प्रशासनाने डॉ. कुमार यांना निलंबित केले आहे.

## ‘क्रांतीकारी आघाडी’; २५ जागा लढविण्याची घोषणा

## आमचा वाढता जनाधार शेट्टींना नकोसा : रविकांत तुपकर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माजी खासदार राजू शेट्टी यांची राजकीय भूमिका सतत बदलत गेल्याने शेतकरी संघटनेचे नुकसान झाल्याचा आरोप करत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी ‘महाराष्ट्र क्रांतीकारी आघाडी’ची घोषणा केली.**



या आघाडीच्या वतीने विधानसभेच्या २५ जागा लढविणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.स्वाभिमानी शेतकरी संघटनेतून सोमवारी (२२ जुलै) तुपकर यांची हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर तुपकर यांनी पुण्यात सहकाऱ्यांची बैठक घेऊन हकालपट्टीच्या निर्णयावर आणि पुढील राजकीय मोर्चेबांधणीवर चर्चा केली. रविकांत तुपकर म्हणाले, ‘माझी काहीही चूक नसताना शेट्टी यांच्या सांगण्यावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. शिस्त पालन समितीला ऑगस्ट २०२३ मध्येच मी माझे मत लेखी कळविले होते. त्याचे उत्तर अद्यापही मला मिळालेले नाही. शेट्टी यांनी कोल्हापूर जिल्ह्यात राजकारण करताना सतत आपल्या सोयीची भूमिका घेतली. कधी भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, तर कधी ‘रिडालो’स सारखा प्रयोग केला. राजकीय स्वार्थासाठी त्यांनी सतत भूमिका बदलल्यामुळेच शेतकरी संघटनेचे नुकसान झाले आहे.’राजू शेट्टी यांची स्वाभिमानी शेतकरी संघटना कोल्हापुरातील तीन तालुक्यांपुरतीच होती. ती संघटना आम्ही राज्यभर नेली. शेट्टी यांनी ऊसदर आंदोलनाच्या बाहेर जाऊन काहीच केले नाही. आम्ही विदर्भ, मराठवाड्यात कापूस, सोयाबीन दरासाठी आंदोलने करीत राहिलो, पण, शेट्टी आमच्या मागे समर्थपणे उभे राहिले नाहीत. आम्ही सतत संघर्ष केला.

### दोन दिवसांपूर्वी माझा नंबर लागला

माजी खासदार राजू शेट्टी यांची राजकीय भूमिका सतत बदलत गेल्याने शेतकरी संघटनेचे नुकसान झाल्याचा आरोप करत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी ‘महाराष्ट्र क्रांतीकारी आघाडी’ची घोषणा केली. चळवळीतील कार्यकर्ता मोठा होऊ नये, असेच त्यांना वाटते. त्यांनी अनेकांची संघटनेतून हकालपट्टी केली. दोन दिवसांपूर्वी माझा नंबर लागला.

## सलगच्या पावसामुळे वाहनांचे नुकसान, नागरिकांची गैरसोय

# पिंपरी पावसामुळे दाणादाण!

## भिंत पडली, झाडे कोसळली, पाणी साचले

| पिंपरी |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या तीन दिवस सुरू असलेल्या पावसामुळे शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी खड्डे पडून सखल भागात पाणी साचले आहे. काही ठिकाणी भिंत कोसळल्याची तर, अनेक ठिकाणी झाडपडीच्या घटना घडून नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे.**



शहर परिसरासह मुळशी व मावळ तालुक्यात तीन दिवसांपासून दमदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे शहरातून वाहणाऱ्या मुळा, पवना, इंद्रायणी नद्यांची पाणी पातळी वाढली आहे. शिवाय, शहरातील सखल भागात पाणी साचले आहे. रस्त्यांवरही पाणी साचून खड्डे पडले आहेत. विविध वाहिन्या टाकण्याचे व रस्त्यांचे काम सुरू असलेल्या ठिकाणी अधिक चिखल निर्माण झाला आहे. त्यातून वाट काढत नागरिकांना जावे लागत असून गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. काही ठिकाणी नागरिकांनीच टाकलेल्या कचऱ्यामुळे पाण्याचा निचरा लवकर होत नसल्याचे चित्र आहे.

नेहरूनगरमध्ये भिंत कोसळली

नेहरूनगर येथील झिरो बॉईज चौकालगत जुनी भिंती कोसळली. दगड व मातीची भिंत होती. त्याखाली चार दुचाकी आणि दोन चारचाकी वाहने अडकली होती. त्यांचे नुकसान झाले आहे. अग्निशमन दलाच्या जवानांकडून जेसीबीच्या साह्याने राडारोडा बाजूला करण्याचे काम सायंकाळपर्यंत सुरू होते. झाडाच्या मुळ्या वाढलेल्या होत्या. त्यामुळे तडे पडून भिंत पडल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

### झाडपडीच्या घटना

पावसामुळे अनेक ठिकाणी झाडपडीच्या घटना घडल्या आहेत. त्याखाली सापडून वाहनांचेही नुकसान झाले आहे. पिंपळे गुरव येथील सुदर्शन चौक, जिल्हा सामान्य रुग्णालय नवी सांगवी, चिंचवड येथील टाटा मोटर्स कंपनीसमोर, चिखली कुदळवाडी येथील मोरे पाटील चौक, थेरगाव येथील बिर्ला हॉस्पिटलसमोर, डांगे चौकालगत जुनी झाडे पडली. काही झाडांच्या फांद्याही पडल्या आहेत. निगडीतील पीएमपी बसथांब्यामागील एक झाड मुळासह कोसळले. त्याखाली सापडून दोन चारचाकी वाहनांचे नुकसान झाले.

> “ कासारवाडी येथील महापालिकेच्या मराठी शाळेजवळील विशाल चैतन्य सहकारी गृहरचना संस्थेच्या परिसरात पावसामुळे पाणी साचले होते. त्यामुळे या परिसरातील वीजपुरवठा बंद ठेवावा लागला होता. महापालिकेकडे तक्रार केल्यानंतर पाणी निचरा करण्यात आला. या भागात नेहमीच पाणी साचते. त्यातून वाट काढून ये-जा करावी लागते. सांडपाणी वाहिनी तुंबल्यामुळे पाण्याचा निचरा होत नाही, त्यामुळे प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.
> **–शांताराम चोरगे,** स्थानिक रहिवासी, कासारवाडी

> “ पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती निवारणासाठी क्षेत्रीय कार्यालय स्तरावर पथक नियुक्त केले आहेत. अग्निशमन विभाग, महापालिका आरोग्य विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग यातील कर्मचारी, अधिकाऱ्यांचा प्रत्येक पथकात समावेश आहे. २४ तास आपत्ती निवारण कक्ष आहे. सर्व विभागांच्या बैठकी घेऊन सूचना दिल्या आहेत. एक पथक महापालिका मुख्यालय स्तरावर आहे. त्यांच्याकडून शहराची पाहणी केली जात आहे. नागरिकांच्या स्थलांतरणासाठी शाळांच्या इमारती आहेत. **–चंद्रकांत इंदलकर,** अतिरिक्त आयुक्त, महापालिका

---

## आदर्शनगर-मोशीतील रस्त्याला अखेर 'ग्रीन सिग्नल'!

### महेश लांडगे यांचा पाठपुरावा; जागा ताब्यात घेण्याबाबतचा प्रश्न निकालात

| पिंपरी |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आदर्शनगर-मोशी येथील गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचा प्रश्न अखेर निकालात निघाला आहे. सदर रस्त्यासाठी जागा ताब्यात घेण्यासाठी जागा मालक विकसकासोबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. त्यामुळे आगाऊ ताबा घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.**





पुणे- नाशिक महामार्गाला जोडणारा आदर्शनगर- मोशी येथील गट नं. ४५३/१ व ४५४/१ पैकी क्षेत्र १२२००.०० चौ. मी. पैकी ६० मी. व १२ मी. रस्ता रुंदी क्षेत्र २८२६. ५६ चौ. मी. क्षेत्राचे प्रपत्र- अ करण्याची कार्यवाही सुरू झाली. त्यामुळे रस्त्याच्या कामासाठी जमिनीचा आगाऊ ताबा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, या भागातील सुमारे २५ हजार नागरिकांच्या रहदारीचा प्रश्न निकालात निघाला आहे.

भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी २०१४ मध्ये मोशी कचरा डेपो परिसरातील 'बफर झोन' कमी करण्याबाबतचा मुद्दा निवडणुकीच्या अजेंड्यावर घेतला होता. त्यानुसार, राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करून त्यांनी १०० मीटरपर्यंत बफर झोन कमी केला. परिणामी, ४०० मीटर बफर झोन हद्दीत पायाभूत सोयी-सुविधा निर्माण होण्यास गती मिळाली.

दरम्यान, आदर्शनगर- मोशी येथील रस्ता जागा ताब्यात नसल्यामुळे रखडला होता. यावर स्थानिक नागरिकांनी सदर रस्ता सुरू करण्याबाबत आमदार महेश लांडगे यांच्याकडे मागणी केली होती. यावर आमदार लांडगे, जागामालक विकसक आणि प्रशासनाचे अधिकारी यांची बैठक झाली. सामोपचाराने रस्त्यासाठी जागेचा ताबा देण्यात जमीन मालकांनी परवानगी दिली. त्यामुळे प्रपत्र- अ आणि जागा हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू केली.

पावसाळ्यामुळे रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. परिणामी, सर्वसामान्य नागरिक आणि वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. किरकोळ अपघाताच्या घटना वाढल्यामुळे नागरिकांत नाराजीचा सूर होता. संबंधित विकसकाने ताबा दिल्यामुळे आगामी काही दिवसांत रस्त्याचे काम पूर्ण होईल.



> “ समाविष्ट गावांतील अंतर्गत रस्ते, डीपी रस्ते विकसित करण्यासाठी आम्ही सकारात्मक भूमिका घेतली. व्यापक जनहिताच्या भूमिकेतून जागामालक विकसक व भूमिपूत्र शेतकऱ्यांनीही त्याला सकारात्मक प्रतिसाद देत आहेत. आदर्शनगर- मोशीतील जागा मालकांचे यासाठी मनापासून आभार मानले पाहिजेत. कारण, त्यांच्या पुढाकारामुळे सुमारे २५ हजार नागरिकांना दिलासा मिळणार आहे. समाविष्ट गावांच्या विकासासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत.
> **–महेश लांडगे, आमदार,**
> भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# नात्यांची घटती संख्या



## भूमिका

**मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजाशिवाय जगू शकत नाही. जो समाजापासून अलिप्त राहतो त्याला आपण सहजच माणसाळलेला नाही अस म्हणतो. समाज हा कुटुंबा पासून बनतो. अनेक कुटुंब त्या समाजात असतात. आणि प्रत्येक कुटुंब नात्यान मिळून बनलेले असते. समाजाची आर्थिक, सामाजिक, भावनिक आणि मानसिक परिस्थिती उत्तम असावी लागते.**

यातील एक जरी स्थिती बिघडली तर समाजात अशांतता माजते. कुटुंबा मिळून समाज बनत असेल तर कुटुंबात सर्वात आधी प्रेम, जिव्हाळा, नात्यांची जपवणूक व्हायला हवी. पूर्वी नात्यांनी घर भरलेलं असायच... निव्वळ नात्यांची रेलचेल असायची.एकत्र कुटुंब असायची कुंटूंबात सुरक्षेची भावना असायची. जाणून बुजून संस्कार करण्याची गरज नव्हती. जेष्ठा सोबत कस वागायचं, एकमेकांवर प्रेम कस करायच, जिव्हाळा, आत्मीयता यांचा सुगंध घरभर दरवळायचा. आजोबाआजींच्या कथा कहाण्या ऐकायची मौज काही औरच होती. कुटुंबातील एकत्र अंगतपंगत बसायची. त्या निमित्ताने दिवसभर घडलेल्या गोष्टी एकमेकांना सांगायचे. सुख दुःख वाटायचे. त्यामुळे नात्यात गोडवा निर्माण व्हायचा. आईवडील, आजीआजोबा, काका काकू, मोठी आई, मोठे बाबा, चुलत आलत, मामा मामी,



आत्या, आते भाऊ अन बहीण, मामे भाऊबहीण, वहिनी दीर, असे एक ना अनेक नाती प्रत्येकाने जपलेली असायची.आपुलकी, आपलेपणा वाढायचा. आता मात्र चित्र बदललं. एकत्रित कुटुंब पद्धती लयास गेली. आपापलेपणा वाढला. काळ बदलला. “हम दो हमारे दो “ ही भावना वाढीस लागली. कुटुंबे विभक्त झाली अन इथूनच नात्यांची संख्या घटत गेली.नाती तीच आहेत. पण त्यामध्ये दुरावा वाढला. हम दो हमारे दो यामुळे भाऊ भाऊ असतील तर त्यांना बहिणीचे नाते नाही आणि बहिणी असतीलतर भाऊ मिळत नाही. घरातील गर्दी कमी झाल्याने आजी आजोबांचा सहवास नाही. त्यामुळे संस्कार वर्गात मुलांना घालण्याची वेळ आपल्यावर आली. जाणूनबुजून विशिष्ट कालावधीतच संस्कार होतात ही विचार धारा.... कितपत योग्य आहे. आता तर हम दो हमारा एक अन मूल हुच द्यायचं नाही अशी आजच्या पिढीची धारणा आहे. मूल होऊ देण्यासाठी वेळ नाही म्हणजे काय? ही नैसर्गिक भावना राहिली नसून ओढून ताणून मूल होऊ द्यायच अन त्याला ओझं समजायचं.. हे विचार कुटुंबा साठी, समाजासाठी कितपत योग्य आहे. ही नात्यांची घट समाजाला काही वर्षात भकास करणार नाही का? नाती नसतील तर जीवनात आनंद राहील का... प्रेम, जिव्हाळा कुठे विकत तर मिळणार नाही. जसा जाणूनबुजून हसण्यासाठी हास्य क्लब असतात.. पुढे असे नात्यांचे क्लब तर सुरु करणार लागणार नाहीत ना... ही चिंता मनाला खूप दा विचार करायला भाग पाडते. होणारी नात्यांची घट समाज, कुटुंबाला परवडेल का? असेच काही वर्षापूर्वी मुलींचा जन्म ओझं समजून आपण पोटातच मारून टाकण्याचा झपाटा लावला. आज परिस्थिती अशी आहे की लग्नासाठी मुलीचे प्रमाण कमी असणे ही समस्या जाणवू लागली.. आणि समाजा समोर संकट निर्माण झाले.. असेच संकट नात्यांचे तर निर्माण होणार नाही ना.... विचार करण्यासारखी गोष्ट आहे. जीवनात प्रत्येक नात प्रत्येकाला मिळाव ही सामाजिक गरज आहे. स्त्री भ्रूण हत्या ही समाजाला लागलेली कीड आहे. ज्याचे परिणाम समाज आज भोगत आहे. लग्नाला मुली न मिळण, जन्मप्रमाण कमी असण आज भयंकर रूप घेत आहे. जेवढे गर्भपात करणारे डॉक्टर जबाबदार तेवढे मुलगी नको म्हणणारे पालकही जबाबदार आहेत. त्याचे भयानक परिणाम समाजाला भोगावे लागत आहेत. लैंगिक अत्याचार वाढले, बलात्कार वाढले. घरातील नाती कमी होतांना प्रत्येकाच्या जीवनात असमतोलपणा आला हे आपल्या लक्षात का येतं नाही. जेंव्हा लक्षात येइल तेव्हा मात्र खुप उशीर झालेला असेल्या निमित्ताने दिवसभर घडलेल्या गोष्टी एकमेकांना सांगायचे. सुख दुःख वाटायचे. त्यामुळे नात्यात गोडवा निर्माण व्हायचा. आईवडील, आजीआजोबा, काका काकू, मोठी आई, मोठे बाबा, चुलत आलत, मामा मामी, आत्या, आते भाऊ अन बहीण, मामे भाऊबहीण, वहिनी दीर, असे एक ना अनेक नाती प्रत्येकाने जपलेली असायची.

## प्रासंगिक »

### निर्यात, ना हमीभाव

***कृषी धोरणांविषयीच्या नाराजीचा फटका बसल्यानंतरही सरकारचा दृष्टिकोन बदलल्याचे दिसत नाही. निर्यातबंदी, हमीभाव, कृषी संशोधन या मुद्द्यांवर पहिले पाढे पंचावन्न अशीच स्थिती आहे...***

अर्थसंकल्पाच्या आदल्या दिवशी सादर झालेल्या आर्थिक सर्वेक्षणात कृषी क्षेत्रासंदर्भात दोन महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित झाले. पहिला मुद्दा शेतीमालाला आंतरराष्ट्रीय बाजारातील भाव मिळू देण्यासंदर्भातील तर दुसरा हवामानबदलांच्या संदर्भातील होता. त्यातील दुसऱ्या मुद्द्याचा प्रभाव अंदाजपत्रकातील कृषीसंदर्भातील चर्चेवर जरूर दिसतो पण पहिल्या मुद्द्याचा मात्र अर्थमंत्र्यांच्या शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ्या भावाचा फायदा घेता येत नाही. त्याला पर्याय म्हणून या महागाईमुळे ग्रस्त होणाऱ्या गरीब ग्राहकाला विशिष्ट शेतीउत्पादनाचे भाव वाढलेले असताना काही थेट रकमेचे अनुदान देणे आणि मग खुल्या बाजारातील भाव वाढू देणे. या पर्यायाचा उल्लेख आर्थिक सर्वेक्षणात करण्यात आला होता. पण त्याचे कोणतेही प्रतिबिंब अर्थमंत्र्यांच्या भाषणात उमटले नाही.

अर्थसंकल्पात सरकारच्या प्राधान्य कार्यक्रमात उत्पादकता वाढवणे, सूक्ष्मलघुमध्यम उद्योगांत रोजगार वाढवणे, कारखान्यातील उत्पादन वाढवणे, शहरांचा विकास घडवून आणणे, महिलांचा श्रमबळातील सहभाग वाढवून त्यांचा उद्योगाच्या संस्कृतीशी संपर्क वाढवणे इत्यादींवर भर देण्याचा प्रयत्न आहे...

## सामान्यांना दिलासा, तरी प्रश्न अनुत्तरितच!

केंद्रीय अर्थसंकल्पाच्या संदर्भात मध्यमवर्गीयांचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न असतो, की आमचा प्राप्तिकर वाढला आहे का? त्याचे अर्थसंकल्पात उत्तर ‘नाही’ असे आहे. नोकरदारांकरिता ‘स्टॅण्डर्ड डिडक्शन’ची मर्यादा वाढवली गेली आहे. अल्प उत्पन्न गटातील नागरिक म्हणतो, की मला स्वस्तात काय मिळणार? अर्थसंकल्पात काही वस्तूंच्या उत्पादनावर कर कमी केल्यामुळे दैनंदिन उपयोगाच्या वस्तू स्वस्त होतील. सरकार आतापर्यंत वस्तू उत्पादनावर प्रोत्साहनपर मदत उद्योजकांना देत होते. या अर्थसंकल्पात तरुणांना दिलासा मिळावा म्हणजे उद्योजकांनी नवा रोजगार निर्माण केला, तर (उद्योजकांच्या ऐवजी) सरकार त्या तरुणांच्या भविष्य निधीत पैसा टाकेल.अर्थसंकल्पात सरकारच्या प्राधान्य कार्यक्रमात कृषीसह इतर उद्योगांत उत्पादकता वाढवणे, सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योगांत रोजगार वाढवणे, कारखान्यातील उत्पादन वाढवणे, शहरांचा विकास घडवून आणणे,



कृषीसाठी राष्ट्रीय सहकार धोरण तयार करणे, महिलांचा श्रमबळातील सहभाग वाढवून त्यांचा उद्योगाच्या संस्कृतीशी संपर्क वाढवणे इत्यादींवर भर देण्याचा प्रयत्न आहे. औद्योगिकीकरणाचे समूह निर्माण करणे, शहरांचा विकास करणे इत्यादींना अधिक महत्त्व दिले जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे सरकारने आर्थिक धोरणांचा आराखडा तयार करण्याचा मानस जाहीर केला आहे. बिहार व आंध्र प्रदेशमधील सत्ताधाऱ्यांनी केंद्र सरकारला पाठिंबा जाहीर करताना सांविधानिक विशेष मागास दर्जा देण्याची मागणी केली होती. तसा दर्जा न देता मागासलेपणाची जी उदाहरणे त्या राज्यांच्या नेत्यांनी दिली होती, त्याचेच विकास प्रकल्प तयार करून ते अर्थसंकल्पात समाविष्ट केले आहेत. ही पद्धती या दोन्ही राज्यांतील जनतेला मान्य आहे का, हे लवकरच कळेल. सरकारचे उत्पन्न ३२ लाख कोटी रुपये अपेक्षित आहे आणि खर्च ४८ लाख कोटी रुपये असणार आहे. म्हणजे तूट सुमारे १६ लाख कोटींची आहे. ती राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.५ टक्के असणार आहे. प्रथमदर्शनी हा अर्थसंकल्प गुतवणूकदारांना पटलेला दिसत नाही. एक तर आर्थिक सर्वेक्षणापासून समभाग बाजार नरम व सावध होता. प्रत्यक्ष अर्थसंकल्पाचे वाचन सुरू असताना शेअरचा निर्देशांक १२०० अंकांनी घसरला. ही घसरण शेअर बाजाराची नाराजी दर्शवते.आर्थिक सर्वेक्षण हे प्रत्यक्ष घडलेल्या विकासाचा व प्रश्नांचा आढावा असतो. त्यामुळे तो खरा असतो. तर अर्थसंकल्पामध्ये खर्च, उत्पन्न व सरकारचे मानस याबद्दलच्या अपेक्षा असतात. म्हणून सर्वेक्षण जास्त विश्वासार्ह वाटावे. जुलै २०२२च्या सर्वेक्षणात म्हटले आहे, की खासगी औद्योगिकीकरणात भांडवल गुंतवणूक मंद गतीने झाली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# श्याम मानव तुतारी गटात जाणार!

## » भाजपा नेत्यांनी मानव यांना म्हटलं ‘सुपारीबाज’

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांच्या एका दाव्याने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ चालू झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी अनिल देशमुख राज्याचे गृहमंत्री असताना त्यांच्यावर दबाव टाकला होता. “फडणवीसांनी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, आमदार आदित्य ठाकरे, विधान परिषदेचे आमदार अनिल परब यांना तुरुंगात टाकण्याचा डाव रचला होता.” असं श्याम मानव यांनी म्हटलं होतं. मानव यांच्या या आरोपांमुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली. पाठोपाठ माजी गृहमंत्री व विद्यमान आमदार अनिल देशमुख यांनी देखील मानव यांच्या दाव्यांना दुजोरा दिला. तसेच देशमुख म्हणाले, “माझ्याकडे यासंबंधीचे पुरावे आहेत.”



श्याम मानव म्हणाले, “अनिल देशमुख गृहमंत्री असतानाच त्यांच्यावर ईडीने कारवाई सुरू केली होती. त्याच काळात काही लोकांनी देशमुखांना सांगितलं की तुम्हाला ईडीच्या प्रकरणातून स्वतःला सोडवायचं असेल, तर तुम्ही १०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात उद्धव ठाकरे यांचं नाव घ्यावं. तसेच दिशा सालियन बलात्कार आणि हत्या प्रकरणात आदित्य ठाकरेंचं नाव घ्यावं. बेकायदेशीर व्यवहार आणि आर्थिक अफरातफर केल्याप्रकरणी अनिल परब यांचं नाव घ्यावं. मात्र देशमुखांनी तसं केलं नाही.”श्याम मानव यांनी केलेल्या दाव्यांनंतर प्रसारमाध्यमांनी थेट अनिल देशमुखांकडे याबाबत विचारणा केली. त्यावर अनिल देशमुख म्हणाले, “मला त्यांनी (देवेंद्र फडणवीस) तीन ते चार प्रतिज्ञापत्रं लिहून द्यायला सांगितली होती. मात्र मी त्यांना स्पष्ट सांगितलं की मी कोणावरही खोटे आरोप करणार नाही. त्यानंतर त्यांनी ईडी व सीबीआयला माझ्या मागे लावून मला अटक करायला लावली. तसेच श्याम मानव यांनी केलेला आरोप खरा आहे. माझ्याकडे त्यासंबंधीचे पुरावे देखील आहेत.”दरम्यान, श्याम मानव यांनी केलेल्या आरोपांवर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. भाजपामधील नेत्यांनी श्याम मानव यांना ‘सुपारीबाज’ म्हटलं आहे. श्याम मानव सुपारी घेऊन फडणवीसांविरोधात बोलत असल्याचा आरोपही भाजपाकडून होत आहे.

अशातच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अजित पवार गटाचे विधान परिषदेतील आमदार अमोल मिटकरी यांनी देखील या वादात उडी घेतली आहे. मिटकरी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे, “महाराष्ट्रातील बुद्धिजीवी म्हणून ओळखले जाणारे अनिसचे प्रमुख, प्राध्यापक श्याम मानव सर लवकरच तुतारी गटात (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार) अधिकृत प्रवेश करून विधानसभेत उमेदवारी घेतलेले दिसतील.”भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांच्या एका दाव्याने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ चालू झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी अनिल देशमुख राज्याचे गृहमंत्री असताना त्यांच्यावर दबाव टाकला होता. “फडणवीसांनी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, आमदार आदित्य ठाकरे, विधान परिषदेचे आमदार अनिल परब यांना तुरुंगात टाकण्याचा डाव रचला होता.” असं श्याम मानव यांनी म्हटलं होतं. मानव यांच्या या आरोपांमुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली. पाठोपाठ माजी गृहमंत्री व विद्यमान आमदार अनिल देशमुख यांनी देखील मानव यांच्या दाव्यांना दुजोरा दिला. तसेच देशमुख म्हणालेतुम्हाला ईडीच्या प्रकरणातून स्वतःला सोडवायचं असेल, तर तुम्ही १०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात उद्धव ठाकरे यांचं नाव घ्यावं. तसेच दिशा सालियन बलात्कार आणि हत्या प्रकरणात आदित्य ठाकरेंचं नाव घ्यावं. बेकायदेशीर व्यवहार आणि आर्थिक अफरातफर केल्याप्रकरणी अनिल परब यांचं नाव घ्यावं. मात्र देशमुखांनी तसं केलं नाही.

### माझ्याकडे त्यासंबंधीचे पुरावे

”श्याम मानव यांनी केलेल्या दाव्यांनंतर प्रसारमाध्यमांनी थेट अनिल देशमुखांकडे याबाबत विचारणा केली. त्यावर अनिल देशमुख म्हणाले, “मला त्यांनी (देवेंद्र फडणवीस) तीन ते चार प्रतिज्ञापत्रं लिहून द्यायला सांगितली होती. मात्र मी त्यांना स्पष्ट सांगितलं की मी कोणावरही खोटे आरोप करणार नाही. त्यानंतर त्यांनी ईडी व सीबीआयला माझ्या मागे लावून मला अटक करायला लावली. तसेच श्याम मानव यांनी केलेला आरोप खरा आहे. माझ्याकडे त्यासंबंधीचे पुरावे देखील आहेत.

# बेटा अजित कितना खाया? सरदार ७० हजार कोटी!

## » विजय वडेट्टीवारांची पंतप्रधान मोदी आणि पवारांवर टीका

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राजकीय नेत्यांचे विविध ठिकाणी दौरे सुरु असून मतदारसंघाचा आढावा घेण्यात येत आहे. मात्र, निवडणुकीच्या आधी राज्याच्या राजकारणात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे. विजय वडेट्टीवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरील ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याच्या आरोपावरून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली. तसेच राज्य सरकारने सुरु केलेल्या लाडकी बहीण योजनेवरूनही विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला. महाराष्ट्रात सर्वाधिक अत्याचाराच्या घटना घडत असल्याचंही त्यांनी म्हटलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अजित पवार यांच्या खांद्यावर हात ठेवला आणि म्हणाले, बेटा अजित कितना खाया? सरदार ७० हजार कोटी खाया. अरे क्या बात करता है! बहुत खाया, ये ले तिजोरी की चाबी रख”, अशा शब्दात विजय वडेट्टीवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची खिल्ली उडवली. वडेट्टीवार पुढे म्हणाले, “भाजपा सरकारने महागाई गगनाला नेहून ठेवली. खाण्याचे तेल ६८ रुपये किलोने मिळत होतं. पण आज तेच तेल १५० रुपये किलो झालं आहे. सर्व वस्तुंवर मोठ्या प्रमाणात जीएसटी लावला.

### आरक्षणावर वडेट्टीवार काय म्हणाले?

साडीवर १८ टक्के जीएसटी लावला आहे. माझी बहीण जर एक हजाराची साडी घेत असेल तर १८० रुपये जीएसटी द्यावा लागतो. आता लाडकी बहीण योजना आणता? महाराष्ट्रात सर्वाधिक आत्याचाराच्या घटना घडल्या आहेत. उत्तर प्रदेश आणि बिहारला महाराष्ट्राने मागे टाकले आहे. सरकारने आधी बहिणींचं संरक्षण केलं पाहिजे, हीच खरी लाडकी बहीण ठरेल”, असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणाचा प्रश्न चर्चेत आहे.मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्यायचं की ओबीसी कोट्यातून हा निर्णय राज्य सरकारने घ्यायचा आहे.

# नितीश कुमार बिहार विधानसभेत भडकले!

## आरक्षणाच्या मुद्द्यावर हंगामा करण्यात काहीही अर्थ नाही

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार ( NITISH KUMAR ) आज विधानसभेत चांगलेच भडकले. बिहार विधानसभेत पावसाळी अधिवेशन सुरु आहे. अधिवेशनाचं कामकाज सुरु झालं तेव्हा विरोधी पक्षातल्या नेत्यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन गदारोळ सुरु केला. काही आमदार वेलमध्येही उतरले आणि गदारोळ करु लागले. मागच्या वर्षी दलित आणि मागासवर्गासाठी आरक्षणाची मर्यादा वाढवली होती. अशात आज पुन्हा या मुद्द्यावरुन हंगामा सुरु झाला. या दरम्यान मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आम्ही या संदर्भात केंद्राला पत्र लिहिलं आहे असं सांगितलं. मात्र विरोधी पक्षाचा हंगामा सुरु होता. त्यानंतर नितीश कुमार हे चांगलेच चिडले.**

नितीश कुमार ( NITISH KUMAR ) यांचा संताप विधानसभेत चांगलाच चर्चेत राहिला. ते संतापले आणि राजदच्या महिला आमदारावर ते खेकसले. रेखा देवी या महिला आमदार आरक्षण ९ व्या सूचीत समाविष्ट करा अशी मागणी करत होत्या. रेखा देवींवर नितीश कुमार भडकले आणि म्हणाले महिला आहेस, तुला काहीही माहीत नाही, कुठून येतात हे लोक ? यांनी काय केलं आहे? असंही नितीश कुमार म्हणाले. २००५ नंतर आम्ही महिलांच्या सबलीकरणासाठी पावलं उचललं आहे. आता मी जे काही बोलतो आहे ते शांतपणे ऐका, आता मी बोलतो आहे. असं म्हणत नितीश कुमार चांगलेच संतापले.नितीश कुमार म्हणत होते की तुम्ही आता गदारोळ करु नका, विरोधकांनी जरा शांत रहावं. आरक्षणाच्या मुद्द्यावर हंगामा करण्यात काहीही अर्थ नाही. मात्र विधानसभेचं कामकाज सुरु होताच विरोधकांनी गदारोळ घातला. तसंच काही जण वेलमध्येही उतरले. विधानसभेचे अध्यक्ष नंदकिशोर यादव हे वारंवार विरोधकांना जागेवर जाऊन बसा असं सांगत होते. मात्र विरोधी पक्षाचे नेते गदारोळ घालत होते. या दरम्यान नितीश कुमार उभे राहिले. त्यांनी सांगितलं की जातनिहाय जनगणना झाल्यानंतर आरक्षणाची मर्यादा आम्ही वाढवली आहे. मात्र न्यायालयाने त्याला स्थगिती दिली आहे. या निर्णयाच्या विरोधात आम्ही आता सर्वोच्च न्यायालयातही गेलो आहे. तसंच तुमचा जो प्रश्न आहे त्या प्रश्नी आम्ही केंद्राला पत्र लिहिलं आहे. ९ व्या सूचीबाबत आम्ही केंद्राला विनंती केली आहे. आता या प्रकरणी गदारोळ घालून काहीही होणार नाही असं नितीश कुमार सांगत होते. मात्र विरोधकांनी गदारोळ घालत होते. त्यामुळे नितीश कुमार संतापले. नितीश कुमार ( NITISH KUMAR ) यांचा संताप विधानसभेत चांगलाच चर्चेत राहिला. ते संतापले आणि राजदच्या महिला आमदारावर ते खेकसले. रेखा देवी या महिला आमदार आरक्षण ९ व्या सूचीत समाविष्ट करा अशी मागणी करत होत्या. रेखा देवींवर नितीश कुमार भडकले आणि म्हणाले महिला आहेस, तुला काहीही माहीत नाही, कुठून येतात हे लोक ? यांनी काय केलं आहे? असंही नितीश कुमार म्हणाले. २००५ नंतर आम्ही महिलांच्या सबलीकरणासाठी पावलं उचललं आहे. आता मी जे काही बोलतो आहे ते शांतपणे ऐका, आता मी बोलतो आहे. असं म्हणत नितीश कुमार चांगलेच संतापले.नितीश कुमार म्हणत होते की तुम्ही आता गदारोळ करु नका, विरोधकांनी जरा शांत रहावं. आरक्षणाच्या मुद्द्यावर हंगामा करण्यात काहीही अर्थ नाही. मात्र विधानसभेचं कामकाज सुरु होताच विरोधकांनी गदारोळ घातला. तसंच काही जण वेलमध्येही उतरले. विधानसभेचे अध्यक्ष नंदकिशोर यादव हे वारंवार विरोधकांना जागेवर जाऊन बसा असं सांगत होते. मात्र विरोधी पक्षाचे नेते गदारोळ घालत होते. या दरम्यान नितीश कुमार उभे राहिले. त्यांनी सांगितलं की जातनिहाय जनगणना झाल्यानंतर आरक्षणाची मर्यादा आम्ही वाढवली आहे. मात्र न्यायालयाने त्याला स्थगिती दिली आहे. या निर्णयाच्या विरोधात आम्ही आता सर्वोच्च न्यायालयातही गेलो आहे. तसंच तुमचा जो प्रश्न आहे त्या प्रश्नी आम्ही केंद्राला पत्र लिहिलं आहे. ९ व्या सूचीबाबत आम्ही केंद्राला विनंती केली आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार ( NITISH KUMAR ) आज विधानसभेत चांगलेच भडकले. बिहार विधानसभेत पावसाळी अधिवेशन सुरु आहे. अधिवेशनाचं कामकाज सुरु झालं तेव्हा विरोधी पक्षातल्या नेत्यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन गदारोळ सुरु केला.

### आरक्षणाची मर्यादा वाढवली होती

काही आमदार वेलमध्येही उतरले आणि गदारोळ करु लागले. मागच्या वर्षी दलित आणि मागासवर्गासाठी आरक्षणाची मर्यादा वाढवली होती. अशात आज पुन्हा या मुद्द्यावरुन हंगामा सुरु झाला. या दरम्यान मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आम्ही या संदर्भात केंद्राला पत्र लिहिलं आहे असं सांगितलं. मात्र विरोधी पक्षाचा हंगामा सुरु होता. त्यानंतर नितीश कुमार हे चांगलेच चिडले.बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार ( NITISH KUMAR ) आज विधानसभेत चांगलेच भडकले. बिहार विधानसभेत पावसाळी अधिवेशन सुरु आहे. काही आमदार वेलमध्येही उतरले आणि गदारोळ करु लागले. मागच्या वर्षी दलित आणि मागासवर्गासाठी आरक्षणाची मर्यादा वाढवली होती.

# प्रणिती शिंदे यांचं लोकसभेत पहिलंच भाषण

## मराठा आरक्षणावरून राज्य आणि केंद्रावर केली टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**गेल्या वर्षभरापासून मनोज जरांगे पाटलांनी मराठा आंदोलनासाठी उपोषण छेडलं आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावं याकरता मनोज जरांगे यांनी मागणी लावून धरली आहे. तर, अनेक राजकीय नेतेही या मागणीसाठी अडून बसले आहेत. दरम्यान, काँग्रेसच्या नवनिर्वाचित खासदार प्रणिती शिंदे यांनीही मराठा आरक्षणाचा विषय आज सभागृहात मांडला.**

खासदार झाल्यानंतर आज त्यांनी पहिल्यांदाच लोकसभेत भाषण केलं. त्यामुळे त्यांच्या पहिल्या भाषणाकडे सर्वांचं लक्ष होतं.सरकार अनेक कंपन्यांचं खासगीकरण करत आहे. यामुळे आरक्षण संपवण्याचं कटकारस्थान सुरू आहे. आमच्या महाराष्ट्रात सध्या मराठा आरक्षण, धनगर आरक्षणासाठी लोक रस्त्यावर उतरले आहेत. जरांगे उपोषणाला बसले आहेत.

धनगर समाज एसटीत येण्यासाठी मागणी करत आहेत. परंतु, राज्य सरकार तणाव वाढवत आहेत", असं प्रणिती शिंदे म्हणाल्या.प्रणिती शिंदे पुढे म्हणाल्या, "केंद्र आणि राज्य सरकार भाजपाचे आहे. मग या प्रकरणी निकाल द्यायला एवढा वेळ का लावला जातोय? सतत महाराष्ट्रात तणाव वाढत आहे. माझी मागणी आहे की मराठा आरक्षण आणि धनगर आरक्षणावर बोलावं आणि निर्णय द्यावं.""जातीय जनगणनेची मागणी राहुल गांधींनी केली आहे. महिला आरक्षणाचं बिल पास केलं. पण अजूनही जातीय जनगणना झालेली नाही.

### मनोज जरांगेंनी उपोषण घेतलं मागे

मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील हे १३ जुलैपासून उपोषणाला बसले होते. मात्र आता त्यांनी त्यांचं उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने मनोज जरांगेंकडे दोन महिन्याची मुदत मागितली होती. मात्र, मनोज जरांगे यांनी सरकारला १३ जून ते १३ जुलैपर्यंत एक महिन्याचा अवधी दिला होता. १३ जुलैपर्यंत सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न निकाली न काढल्यामुळे मनोज जरांगे पुन्हा उपोषणाला बसले. मात्र काल (मंगळवार, २३ जुलै) रात्री मनोज जरांगे यांची प्रकृती ढासळली. परिणामी त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना जबरदस्तीने सलाईन लावली.

# ‘गोलमाल 5’ चित्रपटाच्या प्रदर्शनाबद्दल रोहित शेट्टीचे मोठे विधान

बॉलीवूडमध्ये काही चित्रपट असे आहेत, ज्यांचा वेगळा चाहता वर्ग आहे. त्यापैकी ‘गोलमाल’ हा चित्रपट आहे. या चित्रपटाचे चार भाग आतापर्यंत आले आहेत आणि गोलमाल सीरिजच्या चारही भागांनी प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले आहे. आता ‘गोलमाल ५’ हा चित्रपट कधी येणार, याची प्रेक्षकांना उत्सुकता लागलेली आहे. आता चित्रपटाचा दिग्दर्शक रोहित शेट्टीने यावर मोठे वक्तव्य केले आहे.रोहित शेट्टीने नुकतीच ‘पिंकविला’ला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये रोहित शेट्टीने ‘गोलमाल ५’ या चित्रपटाबद्दल वक्तव्य केले आहे. तो म्हणाला, “गोलमाल सीरिज कायम बनत राहील. चित्रपट बनणार नाही, असे होणार नाही. या चित्रपटावर काम सुरू आहे. मात्र, त्यासाठी अजून वेळ लागेल.” याआधी दिलेल्या एका मुलाखतीत त्याने म्हटले होते की,



येत्या दोन वर्षांत तुम्हाला ‘गोलमाल ५’ चित्रपट पाहायला मिळेल. हा चित्रपट आधीच्या चित्रपटांपेक्षा वेगळा असेल. हा कॉमेडी चित्रपट असून तो मी ॲक्शन चित्रपटांसारखा बनवू शकत नाही. या चित्रपटाचा खास चाहतावर्ग असून त्यांच्यासाठी ही सीरिज कायम सुरू राहणार, असं तो म्हणाला होता.२००६ साली ‘गोलमाल फन अनलिमिटेड’ हा चित्रपट आला होता.

## ती मला तिचा आधारस्तंभ मानते

बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा गेल्या काही दिवसांपासून तिच्या विवाहामुळे मोठ्या चर्चेत आहे. तिने झहीर इक्बालबरोबर लग्नगाठ बांधली असून तिने लग्न करणार असल्याचे जाहीर केल्यापासून ती मोठ्या चर्चेत होती. आंतरधर्मीय लग्न करत असल्यामुळे तिच्यावर मोठी टीका करण्यात आली होती. याबरोबरच सोनाक्षी आणि संपूर्ण सिन्हा कुटुंबाविरुद्ध मोर्चेदेखील काढल्याचे पाहायला मिळाले होते.सोनाक्षी आणि झहीरने नुकतीच ‘गल्लाटा इंडिया’ला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान या जोडप्याने शत्रुघ्न सिन्हा यांचा एक व्हिडीओ दाखवला आहे. या व्हिडीओमध्ये शत्रुघ्न सिन्हांनी आपल्या मुलीच्या लग्नाबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, सोनाक्षी आणि झहीर हे एकमेकांसाठी बनलेले आहेत. लोकांनी काहीही म्हणण्याचा प्रयत्न केला, मात्र आमच्यासाठी आमच्या मुलांचा आनंद सर्वोच्च आहे. विशेष म्हणजे आमच्या मुलीचा आनंद आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. आम्हाला वाटतं की, ती आनंदी आहे आणि कायम आनंदी राहील. तिने काहीच असंवैधानिक किंवा कायद्याच्या विरुद्ध केलेले नाही. पालक आपल्या मुलांसाठी खूप काही करतात आणि मुलीसोबत खंबीरपणे उभे राहणे हा छोटा वाटा आहे. तिच्या निर्णयांमध्ये आणि आनंदामध्ये मी कायमच तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा असेन, असे सोनाक्षीने दाखवलेल्या व्हिडीओ क्लीपमध्ये त्यांनी म्हटले आहे.

## सायकलने शाळेत जायची परिणिती



परिणिती चोप्रा सध्या तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. यादरम्यान, तिच्याशी संबंधित एक व्हिडिओ चर्चेत आहे, त्यात तिने सांगितले की, जेव्हा ती लहान होती तेव्हा त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. व्हिडिओमध्ये एका मुलीच्या फेसबुक पोस्टचे स्क्रीनशॉट देखील आहेत, त्यात तिने परिणितीच्या म्हणण्याला पूर्णपणे नकार दिला आहे. परिणितीने सांगितलेल्या सर्व गोष्टी खोट्या असल्याचे ती म्हणाली. आजच्या प्रमाणे त्या काळातही परिणितीची कौटुंबिक पार्श्वभूमी खूप मजबूत होती, असे तिने म्हटले आहे. व्हिडीओ समोर येताच यूजर्स त्याला जोरदार ट्रोल करत आहेत. लोक म्हणतात की परिणीतीने सहानुभूतीसाठी खोट्या गोष्टी सांगितल्या. कियारा-सिद्धार्थसारखे जयमालाचे फंक्शन केल्यामुळे लोक तिला प्रचंड ट्रोल करत आहेत. हा व्हिडिओ 2017 च्या मार्शल आर्ट इव्हेंटमधील आहे. या कार्यक्रमात दिलेल्या मुलाखतीत परिणिती म्हणाली होती की, वाढत्या वयाबरोबर मी आणि माझे भाऊ दोघांनीही अनेक आव्हानांचा सामना केला आहे. त्यावेळी आमच्याकडे जास्त पैसे नव्हते. यासाठी मी सायकलने शाळेत जायचे. बस किंवा कारने जाणेही शक्य नव्हते. त्यावेळी आमच्याकडे गाडीही नव्हती. व्हिडिओमध्ये एका मुलीच्या फेसबूक पोस्टचे स्क्रीनशॉटही आहेत. त्या मुलीने स्वतःला परिणीतीची मैत्रीण असल्याचे सांगितले आहे. अशा खोट्या गोष्टी सांगताना लाज वाटली पाहिजे, असे त्यांनी लिहिले आहे. उच्च समाजातून आलेली असूनही ती कॅमेऱ्यासमोर पडून होती. मला वाटते की प्रत्येक सेलिब्रिटी असेच करतो. सहानुभूतीसाठी तो म्हणाला की त्याच्याकडे गाडी नाही आणि पैसे नाहीत. आम्ही दोघे एकाच शाळेत शिकलो. मला आठवते तिच्या वडिलांकडे गाडी होती. त्याकाळी सायकल चालवण्याचा ट्रेंड असल्यामुळे ती कारऐवजी सायकलने शाळेत यायची. त्यावेळी अनेकांकडे सायकलीही नव्हत्या हेही लक्षात घेण्यासारखे आहे. परिणितीचा हा व्हिडिओ REDDIT साइटवर उपलब्ध आहे. या व्हिडिओवर कमेंट करताना एका चाहत्याने लिहिले होते की, परिणिती नेहमीच थ्रो करत असते. त्यांच्याबद्दल काहीही योग्य नाही. मी भेदभाव करत आहे, असे वाटू शकते परंतू ते खरे आहे की त्यांनी कियारा आणि सिडच्या लग्नाची एन्ट्री देखील कॉपी केली आहे. 17 व्या वर्षी शिक्षणासाठी यूकेला गेल्यावर ती गरीब कशी असेल? दुसऱ्या यूझरने उपरोधिकपणे लिहिले की, बिचारी परिणीती सायकलवरून शाळेत गेल्यानंतर शॉकमध्ये आहे.

## अभिषेकच्या कारचे ऐश्वर्या रायशी कनेक्शन

मुंबईत सध्या पावसाची संततधार आहे. याच पावसात अभिषेक बच्चन (ABHISHEK BACHCHAN) फिरायला बाहेर पडला, पण त्याच्याबरोबर पत्नी ऐश्वर्या राय बच्चन व मुलगी आराध्या नव्हते तर तो भाचा अगस्त्य नंदाबरोबर बाहेर पडला होता. अभिषेक व अगस्त्यबरोबर किंग खानची लाडकी लेक सुहानादेखील होती. बऱ्याच काळापासून सुहाना व अगस्त्य एकमेकांना डेट करत असल्याचं म्हटलं जात आहे, अशातच आता त्यांचा हा फोटो चर्चेत आहे. मंगळवारी रात्री अभिषेक बच्चन त्याच्या नवीन काळ्या कारमध्ये पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाला. यावेळी त्याच्याबरोबर बहीण श्वेता बच्चनचा मुलगा अगस्त्य नंदा, मुलगी नव्या नवेली नंदा आणि शाहरुख खानची मुलगी सुहाना खानही होते. अगस्त्य आणि सुहाना डेट करत असल्याच्या अफवा आहेत. या व्हिडीओने नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. योगेन शाह नावाच्या अकाउंटवरून फोटो शेअर करण्यात आले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटोंमध्ये अभिषेक बच्चन एका मोठ्या काळ्या कारमध्ये ड्रायव्हर सीटवर बसलेला दिसतो. तर त्याच्या शेजारच्या सीटवर त्याचा भाचा अगस्त्य नंदा बसला आहे. त्यांच्या मागे नव्या नवेली नंदा आणि सुहाना खान दिसत आहेत. मुंबईच्या पावसात भिजत सर्वजण गाडीत बसले आणि याच वेळी पापाराझींनी त्यांचे फोटो काढले.

## जान्हवी कपूरचा आजारपणाबाबत मोठा खुलासा



बॉलीवूडचे कलाकार हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटांच्या निमित्ताने, कधी सोशल मीडियावरील पोस्टमुळे, तर कधी त्यांच्या वक्तव्यामुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. बॉलीवूड अभिनेत्री जान्हवी कपूर सध्या आजारपणाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे मोठ्या चर्चेत आहे.‘टाइम्स नाऊ’ला दिलेल्या मुलाखतीत जान्हवीने आपल्या आजारपणाबद्दल खुलासा केला आहे. या मुलाखतीत तिने सांगितले की, मी इतकी आजारी पडले होते की, मला दवाखान्यात ॲडमिट करावं लागलं. माझी प्रतिकारशक्ती खूप कमी झाली होती. ‘मिस ॲण्ड मिसेस माही’ या चित्रपटाचे प्रमोशन सुरू होण्याआधीपासूनच ती सतत काम करत होती. यादरम्यान, मी सतत प्रवासदेखील करत होते, शूटिंग सुरू होते. या संपूर्ण महिन्यात मी खूप थकून गेले होते. ती पुढे म्हणते की, मी एका कार्यक्रमासाठी चेन्नईला गेले होते. तिथून परतल्यावर मला अस्वस्थ वाटत होते. त्यामुळे मी घरीच राहण्याचा निर्णय घेतला आणि कामाचे वेळापत्रक बदलले. मात्र, गुरुवारी प्रकृती खालावली. सुरुवातीला असे वाटत होते, काहीतरी भेसळयुक्त पदार्थ खाल्ला गेला असावा आणि त्यामुळे मला आजारी पडल्यासारखे वाटत आहे. पण, जेव्हा रक्ताची चाचणी केली तेव्हा तर ते वेगळीच बाब समोर आली होती. तिची पचनशक्ती चांगली झाली; मात्र तिला तीव्र अंगदुखी, अशक्तपणाचा सामना करावा लागला. मला माझ्या रोजच्या गोष्टी करण्यात अडचणी येत होत्या, त्यासाठी मला कोणाची तरी मदत घ्यावी लागत होती. त्यामुळे अपंगत्व आल्यासारखे वाटत होते. मी त्यावेळी चालू शकत नव्हते, व्यवस्थित खाऊ-पिऊ शकत नव्हते. जान्हवी कपूरने पुढे म्हटले आहे.

# नताशाची इन्स्टावर पहिलीच पोस्ट

## हार्दिकच्या कमेंटने वेधले सर्वांचे लक्ष

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**काही दिवसांपूर्वी क्रिकेटपटू हार्दिक पंड्या आणि पत्नी नताशा स्टॅनकोविक यांनी वेगळे होण्याची घोषणा केली होती. लग्नाच्या चार वर्षानंतर या जोडप्याने घटस्फोट घेतला. यानंतर नताशा भारत सोडून आपल्या मुलासह सर्बियाला गेली आहे. आता सर्बियाला गेल्यानंतर नताशा स्टॅनकोविचने घटस्फोटानंतरत सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. ज्यावर हार्दिक पंड्याने कमेंट आली आहे. ज्यामुळे तिची सोशल मीडिया पोस्ट प्रचंड व्हायरल होत आहे.**





हार्दिक पंड्याबरोबर घटस्फोट घेतल्यानंतर नताशा स्टॅनकोविच काही क्षण शांततेत घालवण्यासाठी तिथे गेली आहे. तिने आता इन्स्टाग्रामवर एक पोस्ट केली आहे, ज्यामध्ये तिने मुलाबरोबर प्राणीसंग्रहालयात फिरतानाचे फोटो शेअर केले आहेत. नताशाने ही पोस्ट शेअर केल्यानंतर काही वेळातच या पोस्टवर हार्दिक पांड्याच्या दोन कमेंट आल्या आहेत. त्याने पहिल्या कमेंटमध्ये हार्ट इमोजी पोस्ट केला आहे. त्याचबरोबर दुसऱ्या कमेंटमध्ये, नजर लागून नये म्हणून शेअर केला जाणार इमोजी आणि व्वा म्हणणारा हाताचा इमोजी पोस्ट केला आहे. हार्दिकची ही कमेंट लोकांना खूप आवडत आहे.हार्दिक आणि नताशाचे लग्न २०२० मध्ये झाले होते. दोघेही पहिल्यांदा २०१८ मध्ये एका नाईट क्लबमध्ये भेटले. दोघांचे अनेक कॉमन मित्र आहेत. या काळातील किस्सा खुद्द हार्दिकनेच सांगितला होता. तो म्हणाला होता की, "नताशाला मी कोण आहे याची कल्पना नव्हती. तिने मला एका टोपीमध्ये पाहिले होते जिथे आम्ही भेटलो. मी रात्री एक वाजता टोपी, गळ्यात चेन आणि हातात घड्याळ घालून बसलो होतो. तेव्हापासून आम्ही एकमेकांशी बोलू लागलो.त्यानंतर या जोडप्याने २०२० मध्ये त्यांच्या इंगेजमेंटची घोषणा केली. १ जानेवारी २०२० रोजी एका क्रूझ पार्टीत हार्दिकने नताशाशी लग्न केले. यानंतर, त्यांनी कोविड काळात ३१ मे २०२० रोजी कोर्टात लग्न केले. ३० जुलै २०२० रोजी हे जोडपे त्यांच्या मुलाचे म्हणजे अगस्त्यचे पालक झाले. यानंतर २०२३ मध्ये नताशा आणि अगस्त्याचे भव्य लग्न झाले. त्यांनी १४ फेब्रुवारी २०२३ रोजी ख्रिश्चन आणि हिंदू पद्धतीने दोनदा लग्न केले. या जोडप्याचा २ वर्षांचा मुलगाही लग्नाला उपस्थित होता. पण मार्च २०२४ मध्ये त्यांच्या विभक्त होण्याच्या बातम्या येऊ लागल्या.नताशा स्टॅनकोविक आणि अली गोनी 'नच बलिए' सीझन नऊमध्ये एकत्र दिसले होते. 'नच बलिए' हा कपल डान्स शो आहे. या शोच्या नवव्या हंगामात स्पर्धक म्हणून सहभादगी झाले होते. त्यावेळी नताशा आणि हार्दिकचे नाते सार्वजनिक झाले नव्हते. नच बलिए शोच्या एका एपिसोडमध्ये अहमद खानने अली आणि नताशा या दोघांना त्यांच्या ब्रेकअपबद्दल प्रश्न विचारला होता. त्याने विचारले, 'तुमचे ब्रेकअप होऊन पाच वर्षे झाली की, पाच वर्षांनी तुम्ही ब्रेकअप केला?' यावर अली म्हणाला, 'नाही, आमचे ब्रेकअप होऊन चार वर्षे झाली आहेत.' यावेळी नताशा पण म्हणाली होती की हो आमचे ब्रेकअप चार वर्षे झाली होती. अली गोनीने यावेळी सांगितले की, ब्रेकअप झाल्यानंतरही तो नताशाला भेटत राहतो. त्यामुळे त्यांच्या ब्रेकअपला किती वेळ झाला हे ते विसरतात. त्यानंतर नताशा म्हणाली की, तिचे पाच वर्षांत दोनदा ब्रेकअप झाले.

### हार्दिकने हार्ट इमोजी पोस्ट केला

विभक्त होऊनही ते पुन्हा पुन्हा एकत्र येत असत. ब्रेकअपचे कारण सांगताना अली गोनी म्हणाला होता की, 'वेगळ्या संस्कृतीमुळे आम्हाला वेगळे व्हावे लागले आणि मला एका भारतीय मुलीसोबत राहायचे होते.' अली गोनीपासून वेगळे झाल्यानंतर नताशाने बिझनेसमन सॅम मर्चंटला डेट केले. त्यांचे नातेही फार काळ टिकले नाही आणि काही महिन्यांतच ते दोघे वेगळे झाले.हार्दिक पंड्याबरोबर घटस्फोट घेतल्यानंतर नताशा स्टॅनकोविच काही क्षण शांततेत घालवण्यासाठी तिथे गेली आहे. तिने आता इन्स्टाग्राममवर एक पोस्ट केली आहे, ज्यामध्ये तिने मुलाबरोबर प्राणीसंग्रहालयात फिरतानाचे फोटो शेअर केले आहेत. नताशाने ही पोस्ट शेअर केल्यानंतर काही वेळातच या पोस्टवर हार्दिक पांड्याच्या दोन कमेंट आल्या आहेत. त्याने पहिल्या कमेंटमध्ये हार्ट इमोजी पोस्ट केला आहे.

---

# T20 WC 2024 नंतर आयसीसीची मोठी कारवाई!

## निलंबनादरम्यान कामकाजाच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यास सांगितले

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अमेरिकन क्रिकेट बोर्डाला आयसीसीकडून मोठा धक्का बसला आहे. आयसीसीने अमेरिकन क्रिकेटला १२ महिन्यांसाठी निलंबित केले आहे. आयसीसीने अमेरिकेला या निलंबनादरम्यान आपल्या कामकाजाच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यास सांगितले आहे जेणेकरून ते त्यातून अपेक्षित परिणाम साध्य करू शकतील. तसे झाले नाही तर अमेरिकन क्रिकेट बोर्डाला दीर्घकाळ निलंबित केले जाईल.**



श्रीलंकेतील कोलंबो येथे सोमवारी झालेल्या आयसीसी बोर्डाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीत अमेरिकेकडून टी-२० विश्वचषकाच्या यजमानपदाचा आढावा घेण्याचा निर्णयही घेण्यात आला, ज्यामुळे जागतिक संघटनेचे अनेक अधिकारी अडचणीत आले आहेत. या गोष्टीचा आढावा घेण्यासाठी साठी आयसीसीने एक समिती स्थापन केली असून त्यात दक्षिण आफ्रिकेचा लॉसन नायडू, सिंगापूरचा इम्रान ख्वाजा, न्यूझीलंडचा रॉजर टॉस यांचा समावेश आहे.आयसीसीने एका निवेदनात म्हटले आहे की, "आयसीसी बोर्ड पुष्टी करतो की टी-२० विश्वचषक ज्या प्रकारे आयोजित केला गेला आहे, त्याचा आढावा घेतला जाईल. लॉसन नायडू, इम्रान ख्वाजा आणि रॉजर टॉस यांच्या देखरेखीखालील समिती आपला अहवाल बोर्डाला सादर करेल." टी-२० विश्वचषक २०२४ नंतर आयसीसीच्या दोन अधिकाऱ्यांनी राजीनामा दिला होता. ज्यामध्ये क्लेअर फर्लांग आणि ख्रिस टेटली यांचा समावेश होता. क्रिकबझच्या माहितीनुसार, आयसीसीने जरी दोघेही आपली पदे सोडतील असे सांगितले असले तरी ते आधीच अपेक्षित होते.

### अमेरिकन बोर्डाला निलंबित केले जाईल

त्याचवेळी आयसीसीने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकन क्रिकेट बोर्डातील प्रशासन चांगले नाही आणि त्यामुळे ते सध्या आयसीसीच्या मानकांमध्ये बसत नाही. अमेरिकेबरोबरच चिलीचे क्रिकेट बोर्डालाही १२ महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे. आयसीसीने निवेदनात सांगितले की, "अमेरिका क्रिकेट आणि क्रिकेट चिली दोन्ही बोर्डांना त्यांचे कामकाज सुधारण्यासाठी आणि स्वत: ला आयसीसी सदस्यत्व मानकांनुसार सिद्ध करण्यासाठी अधिकृतपणे १२ महिन्यांची नोटीस देण्यात आली आहे. दोन्हीपैकी कोणताही बोर्ड आयसीसीने ठरवलेल्या प्रशासनाच्या मानकांमध्ये फिट बसत नाही.यसीसीकडून मोठा धक्का बसला आहे. आयसीसीने अमेरिकन क्रिकेटला १२ महिन्यांसाठी निलंबित केले आहे. तसे झाले नाही तर अमेरिकन क्रिकेट बोर्डाला दीर्घकाळ निलंबित केले जाईल"आयसीसी बोर्ड पुष्टी करतो की टी-२० विश्वचषक ज्या प्रकारे आयोजित केला गेला आहे, त्याचा आढावा घेतला जाईल.